यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra
Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : www.ycmou.ac.in https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475

मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

दिनांक : २२ /११ /२०२५

# उद्बोधन वर्ग अहवाल
## अर्थशास्त्र पदव्युत्तर पदवी (एम. ए.) शिक्षणक्रम (M50)
## शैक्षणिक वर्ष : २०२५-२६

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (DEB) मार्गदर्शक सूचनांनुसार पदव्युत्तर पदवी (एम. ए.) अर्थशास्त्र (M50) या शिक्षणक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्ग दि. ०९ ऑक्टोबर २०२५ रोजी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमार्फत ऑनलाईन माध्यमातून आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी शिक्षणक्रम संयोजक डॉ. विशाल आंबेडकर यांनी सूत्रसंचालन केले. या उद्बोधन वर्गासाठी मार्गदर्शक म्हणून विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर उपस्थित होते. त्यांनी प्रास्ताविक करून उद्बोधन वर्ग आयोजित करण्यामागील भूमिका विशद केली. तसेच विद्यार्थ्यांना दूरस्थ शिक्षणप्रणाली, मुक्त विद्यापीठाची पार्श्वभूमी, उद्दिष्टे आणि विद्यापीठाची कार्यपद्धती याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ. शायिन शेख (वरिष्ठ शिक्षणक्रम संयोजक, अर्थशास्त्र) यांनी सकाळच्या सत्रात (सकाळी ११:३० ते ०१:३०) PPT च्या माध्यमातून प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार सुरू करण्यात आलेल्या एम. ए. अर्थशास्त्र (M50) या शिक्षणक्रमाची ओळख करून देण्यात आली. यामध्ये शिक्षणक्रमाची उद्दिष्टे, निष्पत्ती, वैशिष्ट्ये, अभ्यासक्रम संरचना, ऐच्छिक अभ्यासक्रम निवड, श्रेयांक, स्वयं-अध्ययन साहित्य, समंत्रण सत्रे, परीक्षा व मूल्यांकन पद्धती, क्षेत्रीय आणि संशोधन प्रकल्प, विद्यार्थी कल्याणाच्या विविध योजना, महत्त्वाची संकेतस्थळे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.


दुपारच्या सत्रात एम. ए. अर्थशास्त्र (M50) शिक्षणक्रमाच्या दुसऱ्या वर्षाला प्रवेशित विद्यार्थांना (दुपारी २:३० ते ४:३०) PPT च्या माध्यमातून तिसऱ्या आणि चौथ्या सत्रातील संशोधन पद्धती (4CP), संशोधन प्रकल्प (6CP), स्वयं-अध्ययन साहित्य, समंत्रण सत्रे, परीक्षा व मूल्यांकन पद्धती याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यामध्ये संशोधन प्रकल्पाचा विषय कसा निवडावा, स्थानिक/प्रादेशिक विकासासाठी कसा उपयोग करावा, तसेच प्रकल्प स्व-हस्ताक्षरात कसा लिहावा याचे विस्तृत विवेचन यामध्ये करण्यात आले. पहिल्या वर्षातील क्षेत्रीय प्रकल्पातील अडचणींचा आढवा घेण्यात आला.


दोन्ही सत्रातील विद्यार्थांना क्षेत्रीय आणि संशोधन प्रकल्पासाठी विद्यापीठाकडून तयार केलेल्या मार्गदर्शिका, अहवाल लेखन आराखडा आणि विषयसूची विषयी सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच रोजगाराच्या भविष्यातील संधी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.


दोन्ही सत्रांच्या शेवटी प्रश्नोत्तरे घेण्यात आली व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या उद्बोधन सत्रामध्ये एम. ए. अर्थशास्त्र शिक्षणक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांचे आभार मानून मा. संचालक यांच्या संमतीने उद्बोधन वर्गाचा समारोप करण्यात आला. हा उद्बोधन वर्ग यशस्वी होण्यासाठी श्री. गुलाब घाटाळ (तांत्रिक सहाय्य) तसेच इतर प्रशासकीय सहाय्यक यांनी मोलाचे सहकार्य केले.

**सोबत** : ऑनलाईन झूम लिंक व फोटो -


Zoom Link - https://shorturl.at/NIPjN













| वर्ष | सत्र | अभ्यासक्रम | | श्रेयांक |
|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य | वैकल्पिक | |
| प्रथम | पहिले | ०५ | ०१ | २२ |
| | दुसरे | ०५ | ०१ | २२ |
| द्वितीय | तिसरे | ०५ | ०१ | २२ |
| | चौथे | ०४ | ०१ | २२ |
| एकूण | | २३ | | ८८ |








मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
ज्ञानगंगा घरोघरी
य.च.म.मु.वि., नाशिक

प्रा. नागार्जुन वाडेकर
संचालक,
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा